महावितरण

महावितरण विद्युत वार्ता

☑ वर्ष १८ वे: अंक ४ ☑ सप्टेंबर २०२३

हितगूज



राज्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या काळात सुरळीत वीजपुरवठा आणि वीज सुरक्षा यासाठी आपण सगळ्यांनी खूप मेहनत घेतली. आता सणासुदीचे दिवस आहेत. नवरात्र, दसरा आणि दिवाळीही जवळ आलेली आहे. त्यावेळेसही आपल्याला वीजपुरवठा सुरळीत ठेवायचा आहे. मिरवणूक मार्गात बऱ्याच ठिकाणी वीज तारेचे अडथळे असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहेत. याची आपण दक्खल घेणे गरजेचे आहे. भविष्यात असे अडथळे येऊ नयेत यासाठी आपण आत्ताच उपाययोजना केली पाहिजे.

मार्च २०२३ अखेर असलेली ६०३७१ कोटी रुपयांची थकबाकी सप्टेंबरमध्ये २०२३ अखेर ६९०२२ कोटी इतकी वाढली आहे. या आर्थिक वर्षात सप्टेंबरपर्यंतच्या ५८४२६ कोटी रुपयांच्या मागणीच्या तुलनेत ४६२६० कोटी रुपयांची वसुली झालेली आहे. वाढतच असलेली थकबाकी हा अतिशय गंभीर विषय आहे.

ग्राहकांनी दरमहा वीज बिल भरणे आवश्यक आहे. यापुढे कोणत्याही परिस्थितीत वीज बिलाची थकबाकी वाढता कामा नये. सातत्यपूर्ण प्रयत्न करून घरगुती, औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांची थकबाकी कमी करणे आवश्यक आहे. शंभर टक्के मागणी वसूल करून थकबाकी कमी करण्यासाठी ठोस प्रयत्न करणे आवश्यक आहे. या महिन्यात थकबाकीची किमान ४०% रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने सर्वच उद्यदाब, औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकाची थकबाकी न चुकता पुढील एका महिन्यात वसूल करण्याचे आपण प्रयत्न केले पाहिजे.

ग्राहकाच्या वीज बिलाची थकबाकी जर सुरक्षा ठेव (SD) / बँक हमीच्या (BG) दुप्पट झाली असेल तर विलंब न करता संबंधित थकबाकीदारांच्या सुरक्षा ठेवीचे / बँकेच्या हमीचे (SD/BG) समायोजन करावे. त्यानंतर लगेच सुरक्षा अमानत / बँकेच्या हमीची मागणी करावी. थकबाकीसाठी समायोजन केल्यानंतर जर ग्राहकांनी पुनः जोडणी शुल्कासह उर्वरित थकबाकीची रक्कम व सुरक्षा ठेव / बँक हमीच्या रकमेचा भरणा केल्यावर प्रथम सुरक्षा अमानत/बँकेच्या हमीला पुनर्संचयित करण्यासाठी समायोजित केले जाये, असे अपेक्षित आहे.

विविध टप्प्यांवर नवीन जोडण्यांसाठी प्रलंबित असलेल्या अर्जाच्या बाबतीत अपेक्षित सुधारणा झालेली दिसत नाही. खरे तर काही भागात प्रगती अजिबात समाधानकारक नाही. त्यामुळे प्रलंबित अर्जावर येत्या १५ दिवसांत कारवाई करून ते निकाली काढावेत. यापुढे 'इज ऑफ लिव्हिंग' च्या निकषानुसार नवीन जोडण्यासाठी नागरी भागात जास्तीत जास्त ७ दिवसात आणि ग्रामीण भागात जास्तीत जास्त १५ दिवसात कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्यात नवीन वीज जोडणी देण्यासाठी लागणारा कालावधी इतर राज्याच्या तुलनेत खूप जास्त आहे. यामुळे आपल्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होतात. पेड पेंडिंग अर्जावर त्वरित कारवाई करून त्याला निकालात काढावे.

नवीन वीज जोडणीसाठी तसेच मीटर बदलण्यासाठी मीटर उपलब्ध केल्यावरही काही मीटर बिलिंग सिस्टममध्ये परावर्तित झालेले नाहीत. त्यामुळे याची त्वरित पडताळणी करून अश्या ग्राहकांचे बिलिंग सुरू करावे. सदोष मीटरची संख्या मोठ्या प्रमाणात असून याची पडताळणी करून सरासरी बिलिंग असलेल्या ग्राहकांची संख्या कमी करणे खूप आवश्यक आहे.

काही भागात विशेषतः मराठवाड्यात सरासरी बिलिंग खूप जास्त आहे. यामुळे ग्राहकांच्या तक्रारीत वाढ होते आणि कंपनीचा महसूलही बुडतो. त्यामुळे बिलिंगमध्ये सुधारणा झाली पाहिजे. सामान्य बिलिंग हे ९५% पेक्षा कमी असणे कोणत्याही स्थितीत स्वीकार्य नाही. यासाठी मीटर रीडिंगची गुणवत्ता आणि अचूकता सुधारण्यासाठी मीटर वाचकांना प्रशिक्षण देण्यात यावे. सोबतच प्रत्येक महिन्याला उपविभागीय स्तरावर अचूक विश्लेषण करून स्थानिक गरजेनुसार उपाययोजना करून बिलिंगमध्ये लाक्षणिक सुधारणा केल्याशिवाय गत्यंतर नाही.

केंद्र शासनाच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेतुन महावितरणला आपली कार्यक्षमता व आर्थिक स्थिरता सुधारण्याकरिता आपल्याला जवळपास ४० हजार कोटींचा निधी उपलब्ध होणार आहे. या योजनेच्या माध्यमातून आपण अनेक प्रकल्प राबविणार आहोत. हे करत असतांना प्रकल्पाच्या अंमलबजावणीत गुणवत्ता सुनिश्चित केली पाहिजे. प्रकल्पाला होणारा विलंब टाळण्यासाठी वन, स्थानिक प्राधिकरण इत्यादी सर्व आवश्यक परवानग्या त्वरित मागवल्या पाहिजेत. तसेच झालेल्या कामाचे बिल वेळेत अदा करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियेला विलंब होता कामा नये. त्यासाठी एसओपी तयार ठेवा.

राज्यात वीज ग्राहकांनी छतावर सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती करण्याच्या बाबतीत केंद्र सरकारने दिलेले १०० मेगावॅट वीजनिर्मितीचे उद्दीष्ट महावितरणने चार महिने आधी पूर्ण केले असून या यशाबद्दल मी वीज ग्राहकांचे आणि महावितरणच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो. उद्दीष्ट पूर्ण झाले असले तरीही आपण ही मोहीम यापुढेही चालू ठेवणार असून अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार करू या.

छतावरील सौर ऊर्जा निर्मितीसाठी केंद्र सरकारकडून वीज ग्राहकांना चाळीस टक्क्यांपर्यंत अनुदान मिळते. केंद्र सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने महावितरणला १९ जानेवारी २०२२ रोजी 'रूफ टॉप सोलार प्रोग्रॅम फेज २' अंतर्गत १९ जानेवारी २०२४ पर्यंत दोन वर्षात घरगुती ग्राहकांसाठी १०० मेगावॅटचे उद्दीष्ट दिले होते. महावितरणने हे उद्दीष्ट दि. २५ सप्टेंबर रोजी म्हणजे चार महिने आधीच पूर्ण केली असून राज्यात रूफ टॉप सोलर वापरणाऱ्या ग्राहकांची एकूण संख्या १,०६,०९६ झाली आहे.

महावितरणने छतावरील सौर ऊर्जा निर्मिती संच बसवून देण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा केली व संबंधित यंत्रणांशी धागला समन्वय साधला. त्यामुळे चार महिने आधी उद्दीष्टपूर्ती करता आली. रूफ टॉप सोलरविषयी उत्कृष्ट कामगिरीसाठी महावितरणला अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठी आपण खूप चांगले काम करीत असून आपली जबाबदारी खूप वाढलेली आहे. निःशंक आपण यात दिलेले लक्ष गाठणारच. ही योजना आपल्या राज्याच्या आर्थिक विकासासाठी फायदेशीर ठरणार आहे. शेतकऱ्यांसोबतच महावितरणचेही भविष्य बदलणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाल्याने सिंचनाचा प्रश्नही मिटणार आहे. या योजनेमुळे उद्योगांवर असलेला क्रॉस सबसिडीचा भार कमी होणार आहे. विजेचे दर यामुळे वाजवी होऊन उद्योगधंद्याला चालना मिळणार आहे. या योजनेमुळे राज्याचा कायापालट होणार आहे. म्हणून आपण ही योजना यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करू या.

आपल्या राज्याच्या विविध क्षेत्रात 'इज ऑफ लिव्हिंग'नुसार लोकाभिमुख प्रशासन व सेवा देण्याच्या राज्य शासनाच्या या लोकप्रिय संकल्पनेला आपल्याला साकार करण्यासाठी हातभार लावणे आवश्यक आहे. मागेल त्यांना तात्काळ नवीन वीजजोडणी, विजेचा सुरळीत व दर्जेदार पुरवठा आणि ग्राहकांनी केलेल्या कोणत्याही तक्रारीचे विनाविलंब निवारण या त्रिसूत्रीचा अवलंब केला पाहिजे. खंडित पुरवठा, बिलिंग, वीज जोडणी याबाबत ग्राहकांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण झालेच पाहिजे. ही सर्व कर्तव्ये तत्परतेने पूर्ण होईल असा माझा विश्वास आहे.

श्री. लोकेश चंद्र
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

'शासन आपल्या दारी' उपक्रमात महावितरणच्या योजनांचा जागर



महावितरण दालनात विविध योजनांची माहिती घेताना वीज ग्राहक

बुलडाणा येथे पार पडलेल्या राज्य शासनाच्या 'शासन आपल्या दारी' उपक्रमात महावितरणच्या डिजीटल सेवा व ग्राहकांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने ग्राहकांनी महावितरणच्या दालनाला भेट देत माहिती घेतली. यावेळी मुख्य अभियंता श्री. दत्तात्रय पडळकर यांनी 'ग्राहकांच्या सुविधेसाठी असलेल्या व ग्राहकांना लाभ देणाऱ्या महावितरणच्या सेवा व योजनांचे लाभ घेण्याचे आवाहन केले.

राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत बुलडाणा येथे आयोजित राज्य शासनाचा 'शासन आपल्या दारी' या उपक्रमात महावितरणच्या विविध योजनांची माहिती देणारे दालन लावण्यात आले होते. या दालनामध्ये वीज जोडणीपासून वीज बिल भरण्यापर्यंत असलेल्या डिजीटल सेवा, त्या सेवांचा ग्राहकांना होणारा फायदा याची माहिती असणारे बॅनर्स व पोस्टर्स लावण्यात आले होते. तसेच शेतकऱ्यांना शाश्वत आणि दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी असणारी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, कृषी धोरण २०२०, रूफ टॉप सोलर योजना, कुसूम योजना इत्यादी योजनांची माहितीही फ्लेक्स व बॅनर्सच्या माध्यमातून देण्यात आली.

यावेळी ग्राहकांच्या शंकांचे समाधानही करण्यात आले. महावितरणच्या सेवा तसेच योजनेचा लाभ घेण्यासाठी कार्यालयात जाण्याची गरज नसून त्या योजनेचा लाभ ऑनलाईन पध्दतीने ग्राहकांना घरबसल्या कसे घेता येते याबाबतही जागृती करण्यात आली. कार्यकारी अभियंते सर्वश्री बदरीनाथ जायभाय, मंगलसिंग चव्हाण, उपकार्यकारी अभियंता श्री. विनोद गुबे, उच्चस्तर लिपीक श्री. श्रीकांत चव्हाण यांच्यामार्फत प्रत्येक व्यक्तींना माहिती देण्यात आली. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. सुरेंद्र कटके, कार्यकारी अभियंते सर्वश्री विरेंद्रकुमार जसमतीया, रत्नदिप तायडे उपस्थित होते.

औरंगाबाद परिमंडलात अभियंता दिन साजरा



अभियंता दिनानिमित्त भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांना मान्यवरांनी अभिवादन केले

औरंगाबाद परिमंडल कार्यालयात भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांची जयंती व अभियंता दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. प्रकाश खपले म्हणाले की, अभियंत्यांनी 'सोशल इंजिनीअरिंग' देखील केली पाहिजे. अभियंत्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून लोकाभिमुख सेवा दिली पाहिजे. यावेळी महापारेषणचे माजी संचालक श्री. उत्तम झाल्टे यांनी विश्वेश्वरय्या यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला. समाजाच्या व देशाच्या प्रगतीत अभियंत्यांचे मोलाचे योगदान असून महावितरणचे अभियंतेही घराघरात प्रकाश पोचवण्याचे काम करत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. कार्यक्रमाचे अध्यक्ष औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अभियांत्रिकीतील योगदान सांगून संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांनीही विजेचा उल्लेख आपल्या साहित्यात केल्याचे दाखले दिले.

अधीक्षक अभियंते सर्वश्री शांतीलाल चौधरी, उत्क्रांत धायगुडे, कार्यकारी अभियंता श्रीमती प्रेरणा बनकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. विनय घनबहादूर, उपकार्यकारी अभियंता श्री. विजय दुसाने, सहायक अभियंता श्री. अविनाश चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता श्री. मोहन काळोगे, उपमहाव्यवस्थापक श्री. प्रवीण बागुल, श्रीमती कांचन राजवाडे, प्रभारी सहायक महाव्यवस्थापक श्रीमती स्वाती चव्हाण-गाडेकर, कार्यकारी अभियंते सर्वश्री प्रसाद महातोले, सतीश खाकसे, जयंत खिरकर, मकरंद कुलकर्णी, प्रेमसिंग राजपूत, प्रणाली विश्लेषक श्रीमती मनीषा निफाडकर, सर्वश्री राजाराम पाटील, रोहित ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमुख लिपिक श्रीमती जयश्री कांबळे, निम्नस्तर लिपिक श्री. सागर अग्रवाल यांनी परिश्रम घेतले.

पुणे परिमंडलाच्या 'सौर' प्रदर्शनाला मोठा प्रतिसाद



'सौर' प्रदर्शनाला केंद्रिय अपारंपारिक ऊर्जा विभागाचे सहसचिव श्री. दिनेश जगदाळे, मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी भेट दिली.

महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोशिएशन (मास्मा) च्या वतीने पुणे येथे सोलर एक्स्पो प्रदर्शनाचे नुकतेच आयोजन करण्यात आले. यात पुणे परिमंडलाकडून स्वतंत्र स्टॉलद्वारे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स आदी योजनांची माहिती देण्यात आली. केंद्रिय अपारंपारिक ऊर्जा विभागाचे सहसचिव श्री. दिनेश जगदाळे, पुणे प्रादेशिक संचालक (प्र.) श्री. अंकुश नाळे, मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार, महाऊर्जाचे अतिरिक्त महासंचालक श्री. पंकज तगलपल्लेवार, 'मास्मा'चे अध्यक्ष श्री. रोहन उपासनी यांनी या प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी सहसचिव श्री. दिनेश जगदाळे यांनी महावितरणकडून सौर ऊर्जा योजनांची सुरु असलेल्या प्रभावी अंमलबजावणीचे व जनजागृतीपर उपक्रमांचे कौतुक केले.

दोन दिवसांमध्ये सुमारे ३५०० नागरिकांनी या स्टॉलला भेट दिली. ग्राहकांना अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. राकेश महाजन, उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पटनी व सहकाऱ्यांनी विविध योजनांची माहिती दिली.

ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्याचा ध्यास घ्या - डॉ. मुरहरी केळे
बिडकीन विद्युत उपकेंद्राला आयएसओ नामांकन



आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान सोहळ्यात मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्यासह बिडकीन उपकेंद्राचे कर्मचारी.

'इज ऑफ लिव्हिंग' अर्थात जगण्याचा दर्जा वाढवण्यासाठी वीज हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा करण्यासह सर्वोत्कृष्ट सेवा देण्याचा ध्यास अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घ्यायला हवा, असे आवाहन औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांनी केले.

औरंगाबाद परिमंडलांतर्गत बिडकीन ३३ केव्ही विद्युत उपकेंद्राला राज्यात दुसरे तथा मराठवाड्यातील पहिले आयएसओ ९००१ : २०१५ मानांकन मिळाले. त्यानिमित्त आयोजित समारंभात मुख्य अभियंता डॉ. केळे बोलत होते. यावेळी औरंगाबाद ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण दरोली, कार्यकारी अभियंता श्री.संदीप देशपांडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंते सर्वश्री विश्वनाथ लहाने, दीपक माने, सहायक पोलिस निरीक्षक श्री. गणेश सुरवसे उपस्थित होते.

यावेळी आयएसओसाठी परिश्रम घेतल्याबद्दल सहायक अभियंता श्री.अविनाश चव्हाण, प्रधान यंत्रचालक श्री.एकनाथ तुपे, उपकेंद्र सहायक सर्वश्री विशाल देवढे, आनंद मोरे, श्रीमती माला राठोड, जनमित्र सर्वश्री जितेंद्र हाडे, रमेश जाधव, रमेश देवरे, अशोक सुरसे, विजय वीर, दीपक वाघमारे, मनीषा राठोड, शंकर गाडेकर, ऋषिकेश सोनवणे, वैभव साखरे, शंकर करताडे, योगेश जाधव, सोपान नीळ, ज्ञानेश्वर गाढे, अमजद शेख, गोरख ठोंबरे यांचा मुख्य अभियंता डॉ.केळे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. परिमंडलातील उर्वरित उपकेंद्रे व महत्त्वाच्या आस्थापनांनीही बिडकीन उपकेंद्राचा आदर्श घेत आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी प्रयत्न करायला हवे आणि वीजग्राहकांना दर्जेदार व तत्पर सेवा दिली पाहिजे, असे आवाहन डॉ.केळे यांनी केले.

यावेळी आयएसओ मानांकनाचे प्रतिनिधी श्री.नंदकुमार देशमुख म्हणाले की, आम्ही सुचवलेल्या सर्व ५९ सुधारणा बिडकीन उपकेंद्राने केल्या. सुरक्षित व अखंडित वीजपुरवठ्यासह सर्व निकषांची काटेकोर अंमलबजावणी केली. गांधेलीचे प्रधान यंत्रचालक श्री.श्रावण कोळनूरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास उपकार्यकारी अभियंता श्री.अशोक घुले, सहायक अभियंते सर्वश्री गणेश राठोड, ईश्वर तावरे, संतोष सुर्वे, रोहित तायडे, पुष्कर पुरंदरे, राजेंद्र राठोड, विनोद शेवणकर यांच्यासह अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकाच दिवशी वितरण पेट्यांचे तीन हजारांहून अधिक दरवाजे केले बंद



औरंगाबादमध्ये वितरण पेटीचे दरवाजे बंद करताना मुख्य अभियंता डॉ. श्री.मुरहरी केळे. सोबत अधिकारी व कर्मचारी.

विद्युत यंत्रणा सुरक्षित ठेवण्यासाठी रोहित्रांवरील वितरण पेट्यांचे उघडे दरवाजे बंद करण्याची मोहीम औरंगाबाद परिमंडलात राबविण्यात आली. यामध्ये औरंगाबाद शहर मंडलात १२००, औरंगाबाद ग्रामीण मंडलात ८९१ व जालना मंडलात ११९२ अशा एकूण ३ हजार २८३ उघड्या वितरण पेट्यांचे दरवाजे बंद करण्यात आले. मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी स्वतः पाहणी करित शहरातील अनेक उघड्या वितरण पेट्यांचे दरवाजे बंद केले.

डॉ. केळे यांनी औरंगाबाद परिमंडलात पदभार स्वीकारताच विविध उपक्रम राबवले आहेत. प्रत्यक्ष वापरात असलेली परंतु महावितरणच्या प्रणालीत नसलेली रोहित्रे प्रणालीत नोंद करण्याची मोहीम त्यांनी राबवली. नवीन ७८०० रोहित्रांची प्रणालीत नोंद करताच रोहित्र नादुरुस्तीचे पूर्वीच्या संख्येनुसार असलेले प्रमाणही आपोआप घटले. त्यानंतर विद्युत सुरक्षेसाठी वितरण पेट्यांचे दरवाजे बंद करण्याची मोहीम त्यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आली. ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यासोबतच विद्युत यंत्रणा सुरक्षित ठेवण्याचे काम महावितरण करते. तथापि, विविध कारणांनी अनेकदा डीपीवरील वितरण पेट्यांचे दरवाजे उघडे व तुटलेले दिसतात.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा उपाययोजना म्हणून सर्व उघड्या वितरण पेट्यांचे दरवाजे स्वयंस्फूर्तीने एकाचवेळी बंद करण्यासाठी मोहीम सकाळी साडेआठ ते साडेदहा या वेळेत राबविण्यात आली. महावितरणची कार्यालये असणारी शहरे व गावे यांचा यात प्राधान्याने समावेश करण्यात आला होता. त्यानुसार परिमंडलातील सर्व अभियंते व जनमित्रांनी ही मोहीम यशस्वी केली. वितरण पेट्यांचे उघडे दरवाजे व नंतर ते बंद केल्याची छायाचित्रे घेऊन परिमंडल कार्यालयास अहवाल पाठविण्यात आला.

इयत्ता 10 वीतील गुणवंत विद्यार्थी



नाव - राम चंदन तळ्हारवार
मंडळ - केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड दिल्ली
गुण - ९८ टक्के
पालक - सौ. मृणाली चंदन तळ्हारवार, उपकार्यकारी अभियंता
व श्री. चंदन रामभाऊ तळ्हारवार, कार्यकारी अभियंता,
उमरेड विभागात नागपूर परिमंडल

इयत्ता 10 वीतील गुणवंत विद्यार्थी



नाव - श्रावण्य रमेश वाघचौरे
मंडळ - केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ
गुण - ९६ टक्के
पालक - श्री. रमेश वाघचौरे, कार्यकारी अभियंता
(चौकशी)
प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

इयत्ता 12 वीतील गुणवंत विद्यार्थी



नाव - मृणाल धीरज बारापात्रे
मंडळ - केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड दिल्ली
गुण - ९५.२० टक्के
पालक - श्री. धीरज बारापात्रे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
नंदनवन उपविभाग, नागपूर परिमंडल

जिल्हा विद्युत समन्वय व सनियंत्रण समितीतर्फे पेण मंडलाची आढावा बैठक



समिती अध्यक्ष व खासदार श्री. श्रीरंग बारणे यांचे स्वागत करताना भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता श्री. सुनिल काकडे

केंद्र शासनाकडून राज्यातील विद्युत प्रणाली बळकटीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्याबाबत अलिबाग-रायगड जिल्हा विद्युत समितीची बैठक नुकतीच घेण्यात आली. यावेळी समितीचे आयोजक व भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता श्री.सुनिल काकडे तसेच पेण मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. इब्राहीम मुलाणी यांच्यासोबत समितीचे अध्यक्ष व मावळ मतदारसंघाचे खासदार श्री.श्रीरंग बारणे, सह अध्यक्ष व रायगड मतदारसंघाचे खासदार श्री. सुनिल तटकरे, सदस्य सचिव व जिल्हाधिकारी अलिबाग-रायगड डॉ. योगेश म्हसे, समिती सदस्य व महाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. भरतशेठ गोगावले, समिती सदस्य व अलिबाग विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. महेंद्र दळवी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यामध्ये केंद्र शासनाच्या पूर्णत्वास आलेले प्रकल्प दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना, इंटिग्रेटेड पॉवर डेव्हलपमेंट स्कीम, एसएसएमआर तसेच एनसीआरएमपी-२ (राष्ट्रीय चक्रीवादळ आपत्ती सौमीकरण योजना) तसेच प्रस्तावित कोकण आपत्ती सौमीकरण योजना बाबत माहिती देण्यात आली. तदनंतर केंद्र शासनाच्या निधी अंतर्गत प्रस्तावित आरडीएसएस (सुधारित वितरण क्षेत्रीय योजना) बाबतच्या आधुनिकीकरण, वितरण हानी कमी करणे, फिडर वेगळे करणे इत्यादी माहितीचे सादरीकरण करण्यात आले. केंद्र शासनाच्या विविध ग्राहकाभिमुख योजनांची अंमलबजावणी नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना समिती सदस्यांनी दिलेल्या आहेत.

विश्वासार्हता वृध्दिंगत करण्यासाठी ग्राहकाभिमुख सेवा द्या; सहव्यवस्थापकीय संचालक श्री. प्रकाश खपले यांचे निर्देश



सहव्यवस्थापकीय संचालक श्री.प्रकाश खपले यांचे स्वागत करताना मुख्य अभियंता श्री.सुंदर लटपटे.

कंपनीची विश्वासार्हता अधिक वाढविण्यासाठी ग्राहकाभिमूख सेवा देणे अत्यावश्यक असून त्यासाठी ग्राहकसेवेला प्राधान्य द्या. त्याचबरोबर वीजबील वसुलीच्या कार्यक्षमतेचे प्रमाण कमी झालेल्या भागातील सर्व अधिकाऱ्यांनी संपूर्ण कार्यक्षमतेने वीजबिलाची वसुली करा अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जा, असे निर्देश महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री.प्रकाश खपले यांनी दिले.

विद्युत भवन येथे मुख्य अभियंता श्री सुंदर लटपटे, अधीक्षक अभियंता श्री.मदन सांगळे, पायाभुत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री.अनिल काळे तसेच प्रादेशिक कार्यालयाच्या चाचणी विभागाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती शुभांगी कटकधोंड, सहाय्यक अभियंता श्री.विपूल पिंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत लातूर मंडलातील विविध कामांचा आढावा घेत श्री. खपले म्हणाले की, नवीन वीज जोडणी देत असताना कमीत कमी कालावधीत देण्यासाठी प्रयत्न करा. पैसे भरून प्रलंबित असलेल्या ग्राहकांचे वीज कनेक्शन निकाली काढा. त्याचबरोबर शेतकऱ्यांना अखंडीत वीजपुरवठा व्हावा यादृष्टीने अवैध वीजजोडण्यांची पाहणी करून कायदेशीर कारवाई करा. सोबतच वीज गळती कमी करण्याच्या हेतूने आकडे टाकून वीज वापरणाऱ्यांवर वेळोवेळी पथके नेमून कारवाई करण्याचेही आदेश दिले. ऑनलाईन सुविधांचा वापर ग्राहकांनी अधिक प्रमाणात करावा यासाठी प्रचार व प्रसिध्दी व्यापक प्रमाणावर करावी, कागद विरहित पर्यावरणपुरक गोग्रीन सारख्या सुविधेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक ग्राहकांपर्यंत संदेश पोहचवा असे निर्देशही श्री. प्रकाश खपले यांनी दिले.

याप्रसंगी मुख्य अभियंता श्री सुंदर लटपटे म्हणाले की, शंभर टक्के वीजबील वसुली होणे महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी अत्यावश्यक असून चालू वीज बिलाच्या मागणीसोबतच थकबाकी वसुलीकडे लक्ष द्यावे. वसुली कमी होण्याचा प्रकार घातक असून तो खपवून घेतला जाणार नाही. संबंधीत अभियंता व अधिकाऱ्यांनी याची दखल घेवून वीजबील वसुलीत सातत्य ठेवावे. शहरी भागातील वसुली ही शंभर टक्के होईल यासाठी प्रयत्नरत रहावे, असे उपस्थित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. सदरील आढावा बैठकीस लातूर मंडलातील सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते तसेच लेखा विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

महावितरणला अधिक लोकाभिमुख करा मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके



श्रीकृष्णनगर शाखा कार्यालयचे उद्घाटन करतांना मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके सोबत इतर उपस्थित मान्यवर

वीज ग्राहकांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करून ग्राहक सेवा गतिमान करण्यासोबतच महावितरणला अधिक लोकाभिमुख करण्याचे आवाहन नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.दिलीप दोडके यांनी केले.

श्रीकृष्णनगर परिसरातील वीज ग्राहकांना जलद सेवा मिळावी यासाठी नागपूर परिमंडलांतर्गत असलेल्या नंदनवन उपविभागातील श्रीकृष्णनगर शाखेचे कार्यालय उमरेड रोड येथून निर्मल नगरी येथे स्थलांतरित करण्यात आले. या कार्यालयाचे उद्घाटन नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

नवीन कार्यालयामुळे ग्राहक सेवा गतिमान होणार असल्याचा विश्वास नागपूर शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री.अमित परांजपे यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी महाल विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.समीर टेकाडे, सहाय्यक कार्यकारी अभियंता श्री. धीरज बारापात्रे यांच्यासह नंदनवन उपविभागातील अधिकारी, अभियंते वा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नाशिक येथे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त बिजली उत्सव



दीपप्रज्वलन करताना मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर, श्रीमती सरस्वती व मान्यवर.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र शासनाच्या ऊर्जा मंत्रालय, भारतीय ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ व महावितरण यांच्यावतीने ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाच्या कामगिरीवर प्रकाश टाकण्यासाठी 'बिजली उत्सव' या महोत्सवाचे आयोजन नाशिक येथे करण्यात आले होते. यावेळी अनेक योजनांचा जागर विविध माध्यमांद्वारे या महोत्सवात करण्यात आला. यावेळी कार्यक्रमात ओढा गावातील उपस्थित लाभार्थ्यांनी, 'वीज जोडणीमुळे जीवनमानात महत्त्वपुर्ण बदल झाला असून, या प्रकाशामुळे प्रगतीकडे वाटचाल झाली' असल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर, भारतीय ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ मुंबईच्या चीफ प्रोग्रामिंग ऑफिसर श्रीमती सरस्वती, ओढा ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती प्रिया पेखळे, कार्यकारी अभियंते सर्वश्री माणिकलाल तपासे व चेतन वाडे मंचावर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता श्री. कुमठेकर म्हणाले की, गेल्या काही वर्षांत वीज क्षेत्राने अभूतपूर्व बदल बघितले असून नाशिक जिल्ह्यातील दुर्गम भागात सुद्धा केंद्र शासनाच्या विविध योजनांमधून वीज जोडण्या दिल्या आहेत. यावेळी भारतीय ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ मुंबईच्या चीफ प्रोग्रामिंग ऑफिसर श्रीमती सरस्वती यांनी प्रास्ताविकातून बिजली उत्सवाची भूमिका विषद करतांना सांगितले की, दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात ३३ हजार तर सौभाग्य योजनेच्या माध्यमातून ५७ हजार वीज जोडण्या महावितरणने दिल्या आहेत. या योजनांमध्ये महावितरणने उत्कृष्ट काम केले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. विविध योजनांची माहिती चित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आली. यावेळी लघुनाटिका सादर करण्यात आली. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना वीज क्षेत्रातील प्राथमिक प्रश्न विचारण्यात आले. उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून बल्ब देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती अनुजा सुराणा यांनी केले. या कार्यक्रमाला भारतीय ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ, मुंबई येथील श्रीमती अंजली पाटील आणि श्री.पुष्पक देशमुख, अतिरिक्त कार्यकारी अभियंते सर्वश्री राजेंद्र भांबर व नितीन घुमरे, ओढाचे पोलीस पाटील श्री.गजानन भोर, गावातील योजनांचे लाभार्थी ग्राहक, विद्यार्थी, अभियंते, अधिकारी व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

'इज ऑफ लिव्हिंग'नुसार वीज ग्राहकांना सेवा द्या – श्री. राजेंद्र पवार

'इज ऑफ लिव्हिंग'नुसार (राहणीमान सुलभता) वीजक्षेत्रात सेवा देण्यासाठी महावितरण कटिबद्ध आहे. राहणीमान सुलभता निर्देशाकांत देशामध्ये पुणे शहराचे वरचे स्थान आहे. त्यामुळे नवीन वीजजोडणी, सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा, ग्राहक तक्रारींचे जलदगतीने निवारण यासाठी पुणे परिमंडलातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत जबाबदारीने तत्पर राहावे, असे निर्देश मुख्य अभियंता श्री.राजेंद्र पवार यांनी दिले.

रास्तापेठ येथील सर विश्वेश्वरय्या प्रशिक्षण सभागृहात गणेशखिंड, रास्तापेठ व पुणे ग्रामीण मंडल अंतर्गत शाखा, उपविभाग व विभाग कार्यालयप्रमुख अभियंत्यांची तीन सत्रात आढावा बैठक झाली. यावेळी श्री. पवार बोलत होते. बैठकीला अधीक्षक अभियंते सर्वश्री अरविंद बुलबुले, युवराज जरग, संजीव राठोड, सहायक महाव्यवस्थापक श्रीमती माधुरी राऊत (वित्त व लेखा), श्रीमती ज्ञानदा निलेकर (मानव संसाधन) यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्याचे उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व ग्राहकाभिमूख सेवा देण्याची सूचना केली आहे. तसेच अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी नुकतीच पुणे येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये 'इज ऑफ लिव्हिंग'नुसार ग्राहकसेवेतील तत्परता आणखी वाढविण्याचे निर्देश दिले. याचा संदर्भ देत श्री. पवार म्हणाले, वीज ग्राहकांनी केलेल्या कोणत्याही तक्रारीचे जलदगतीने निवारण, ताबडतोब वीजजोडणी आणि सुरळीत वीजपुरवठा याबाबत मुख्यालय व परिमंडलस्तरावरून अत्यंत गांभिर्याने उपाययोजना व पर्यवेक्षण सुरु आहे. दैनंदिन आढावा घेण्यात येत आहे. त्यामुळे तत्पर ग्राहकसेवेत कोणताही विलंब खपवून घेतला जाणार नाही.

ते म्हणाले, की महावितरणच्या 'ऑनलाइन' ग्राहकसेवेमध्ये पुणे परिमंडल राज्यात आघाडीवर आहे. मात्र ज्या ग्राहकास नवीन वीजजोडणी, नावात बदल आदींसाठी 'ऑनलाइन'द्वारे प्रक्रिया शक्य नसेल त्यांना तत्परतेने सहकार्य करण्याचे आणि सध्या पावसाळा व सणासुदीचे दिवस असल्याने सुरळीत वीजपुरवठ्यासाठी आवश्यक उपाय करण्याचे निर्देश त्यांनी दिले. या आढावा बैठकीला सर्व शाखा कार्यालय, उपविभाग कार्यालय, विभाग कार्यालयप्रमुख अभियंते तसेच इतर वरिष्ठ अभियंता व अधिकारी उपस्थित होते.

वाढदिनी गरजू लोकांना धान्य वाटपाचा संकल्प



गरजू लोकांना मदत करताना अधिकारी व कर्मचारी

कोल्हापूर शहरातील जरगनगर शाखेतील वीज कर्मचाऱ्यांनी वाढदिवसाचा केक व हार तुरेचा खर्च टाळून गरजू लोकांना धान्यस्वरूपात मदत देऊन वाढदिवस साजरा करण्याचा संकल्प केला आहे. जरगनगर शाखेतील यंत्रचालक श्री. समुद्रे मिस्त्री यांच्या वाढदिवसापासून याची सुरुवात करण्यात आली. यात एका गरजू आजींना आवश्यक धान्य वाटप करण्यात आले.

यापूर्वी सहायक अभियंता श्री. अश्विनकुमार वागळे यांना सामाजिक कार्यकर्त्या राणीताई गायकवाड यांच्या संदेशानंतर जरगनगर शाखेच्या वीज कर्मचाऱ्यांनी संभाजीनगर रेसकोर्स नाका येथील दोन गरजू व्यक्तींना दीड महिन्याचे राशन देऊन सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय दिला. आता प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या वाढदिनी गरजूंना मदत करण्यात येणार आहे.

कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक लेखा भ.नि.नि. खाते पत्रिकेचे प्रकाशन



लेखा खाते पत्रिकेचे प्रकाशन करताना मान्यवर.

आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता केंद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने व्याज दर ८.१५% घोषीत केलेला आहे. त्याचा लाभ तिन्ही कंपनीच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना होणार आहे. वैयक्तीक लेखा खाते पत्रिका (PLA-SLIP) वर्ष २०२२ - २०२३ भविष्य निर्वाह निधिच्या पोर्टलवर (CPF PORTAL) वर सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. नुकतेच या लेखा खाते पत्रिकेचे (PLA-SLIP) प्रकाशन म.रा.वि.मं. भविष्य निर्वाह निधी न्यासचे विश्वस्त तथा म.रा.वि.मंडळ सूत्रधारी कंपनीचे प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक (लेखा) श्री. चंद्रशेखर गद्रे यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी म.रा.वि.मं. भनिनि न्यास विश्वस्त तथा महानिर्मितीचे मुख्य महाव्यवस्थापक (वित्त) श्री. पंकज शर्मा, विश्वस्त श्री. किशोर अहिवळे, सचिव तथा महापारेषणचे सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), श्री. मंगेश खराटे, उप व्यवस्थापक श्री. रामनाथ साबळे, कर्मचारी सर्वश्री अजय शिंदे, उत्तम नाक्ती व सौ. तेजश्री सोनावले हे उपस्थित होते.

शिर्डी येथे स्टॉलच्या माध्यमातून जनजागृती



स्टॉलच्या ठिकाणी उपस्थित अधिक्षक अभियंता श्री. प्रकाश खांडेकर, कार्यकारी अभियंता श्री. अनिल थोरात यांच्यासह अभियंते, अधिकारी व कर्मचारी.

शासन आपल्या दारी या अभियाना अंतर्गत शिर्डी येथे आयोजित कार्यक्रमात शासनाच्या योजनांची माहिती देण्यासाठी स्टॉल लावण्यात आले होते. नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर विभागाकडून या ठिकाणी स्टॉल लावण्यात आला होता. या ठिकाणी एलईडी वॉलवर छायाचित्र, ग्राफिक्सच्या माध्यमातून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, गो ग्रीन, विविध ऑनलाईन सेवा, विद्युत सुरक्षितता, वीज बचत अशा अनेक बाबींची माहिती ग्राहकांना देण्यात आली. या स्टॉलला बहुसंख्य ग्राहकांनी भेट दिली. महावितरणच्या विविध योजनांची माहिती पत्रकाचे सुध्दा वाटप यावेळी ग्राहकांना करण्यात आले.

यावेळी ग्राहकांच्या तक्रारी आणि चौकशीच्या नोंदी सुध्दा घेण्यात आल्या. अहमदनगर मंडलाचे अधिक्षक अभियंता श्री. प्रकाश खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. अनिल थोरात यांच्यासह अभियंते, अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

ग्राहकांना तात्काळ वीज जोडणी देण्याचा स्तुत्य उपक्रम



शिबिरात अधीक्षक अभियंता श्री इब्राहीम मुलाणी यांच्या सोबत ग्राहक व कर्मचारी.

नवीन वीज कनेक्शन घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना शहरी भागात चोवीस तासात तर ग्रामीण भागात ४८ तासात कनेक्शन देण्याची मोहिम राज्यभर सुरु असून भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे यांनी तीनही मंडलातील अधीक्षक अभियंत्यांना सदर मोहिमेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. याचाच एक भाग म्हणून पेण मंडलातील अलिबाग मधील पोयनाड येथे वीज ग्राहकांना तात्काळ नवीन जोडणी देण्यासाठी पोयनाड शाखा कार्यालय १ व २ मध्ये नुकतेच शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नवीन वीज कनेक्शन घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना तात्काळ वीज जोडणी देणे, ग्राहकांच्या तक्रारी सोडवणे व इतर ग्राहक सेवांत परिमंडल स्तरावर मोठ्या प्रमाणात वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर पेण मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री इब्राहीम मुलाणी व अलिबाग विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. शैलेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग २ येथील उपकार्यकारी अभियंता श्री. कमलाकर अंबाडे यांनी पोयनाड शाखा १ व २ येथे शिबिराचे आयोजित केले. सदर शिबिरामध्ये १८ ग्राहकांना तात्काळ वीज जोडणी देऊन महावितरणने 'शासन आपल्या दारी' याचा उत्तम प्रत्यय दिला आहे.

शिबिराची सुरवात झाल्यावर लगेच ग्राहकांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरून घेतले. अर्जदाराच्या जागेची पाहणी करून, टेक्निकल सर्वे केल्यानंतर अर्जदारांना कोटेशन देण्यात आले व ऑनलाईन पैसे भरून घेतले. विशेष म्हणजे, सदर ग्राहकांना काही तासातच वीज कनेक्शन देण्याची सुरवात होऊन काम पूर्ण झाले.

या कार्क्रमासाठी पोयनाड शाखा १ व २ येथील कनिष्ठ अभियंते सर्वश्री रुपेश नागावकर, संदीप म्हात्रे, ओमप्रकाश सावळे व आकाश झाकिरे यांनी विशेष मेहनत घेतली. यापुढेही ग्राहकांना तत्पर सेवा देऊन महावितरण आपला एक वेगळा ठसा निर्माण करेल अशी आशा ग्राहक प्रतिनिधी श्री.देवव्रत पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. पोयनाड व कुसुम्बळे येथील वीज ग्राहक व ग्राहक प्रतिनिधी म्हणून श्री राजेश टेमकर यांची उत्स्फूर्त उपस्थिती होती.

हरपवडे गावातील धनगरवाडा झाला स्वातंत्र्य दिनी प्रकाशमान



धनगरवाड्याचे विद्युतीकरण, सोबत ग्रामस्थ दिसत आहेत.

'प्रत्येक घर प्रकाशमान व्हावे' हाच महावितरणचा ध्यास आहे. तोच ध्यास कृतीत उतरवत गडहिंग्लज विभागातील आजरा तालुक्यातील हरपवडे गावाशी संलग्न धनगरवाडा स्वातंत्र्य दिनी प्रकाशमान झाला आहे. लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून महावितरणने ही कामगिरी केली आहे.

या धनगर वाड्यात २५ कुटुंबाचा रहिवास आहे. दळण वळणापासून वंचित, अत्यंत दुर्गम व वनविभागाच्या क्षेत्रातील हा धनगरवाडा प्रकाशमान करण्यासाठी यंत्रणेने अथक परिश्रम घेतले आहेत. जिल्हा नियोजन व विकास समितीच्या निधीतून हा धनगरवाडा प्रकाशमान करण्यासाठी ६३ केव्हीए क्षमतेच्या वितरण रोहित्र उभारणीचे काम करण्यात आले. चिखल वाट तुडवीत हाताने खेचून वितरण रोहित्र पोहचविण्याचे कठीण कार्य जनमित्रांसह कंत्राटदारांच्या कर्मचाऱ्यांनी केले.

या कामी कोल्हापूरचे जिल्हाधिकारी श्री. राहुल रेखावार, आमदार श्री. प्रकाश आबिटकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अधीक्षक अभियंता श्री. अंकुर कावळे, गडहिंग्लज विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. विजयकुमार आडके यांच्या मार्गदर्शनाखाली आजरा उपविभागीय अभियंता श्री. सुहास मिसाळ, शाखा अभियंता श्री. शरद पाटील व जनमित्रांनी ही कामगिरी यशस्वीपणे पूर्ण केली. याबद्दल मुख्य अभियंता श्री. परेश भागवत यांनी सबंधित सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

धोकादायक परिस्थितीत चोख कामगिरी; पुण्यातील अभियंता, कर्मचाऱ्यांचा गौरव



आयुक्त श्री. शेखर सिंह यांच्याहस्ते गौरव स्विकारताना सहायक अभियंता श्री. संतोष झोडगे.

पुणे परिमंडलातील निगडीमधील भक्तीशक्ती चौकात एलपीजी गॅसचा टँकर उलटल्यानंतर संभाव्य धोका टाळण्यासाठी सहायक अभियंता श्री. संतोष झोडगे व सहकाऱ्यांनी केलेल्या कामगिरीची दखल घेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्री. शेखर सिंह यांच्याहस्ते पालिकेच्या सभागृहात नुकताच गौरव करण्यात आला.

निगडीमधील कै. मधुकरराव पवळे पुलाजवळ मुंबईवरून पुण्याच्या दिशेने जाणारा भारत पेट्रोलियमचा एलपीजी गॅस टँकरला पहाटे अपघात झाला होता. टँकरमध्ये १८ टन गॅस असल्याने संभाव्य धोका टाळण्यासाठी पोलीस विभागाकडून महावितरणला वीजपुरवठा बंद करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार महावितरणकडून निगडी गावठाण, सेक्टर २४ व २६ तसेच साईनाथनगर परिसरातील पहाटे पाच वाजता चार रोहित्रांचा वीजपुरवठा बंद करण्यात आला होता. तसेच सहायक अभियंता श्री. संतोष झोडगे तसेच जनमित्र सर्वश्री प्रशांत माळोदे, जितेंद्र सारंगधर, गोपाळ गिरी व किरण नलगे यांनी त्याच ठिकाणी दिवसभर उपस्थित राहून कर्तव्य बजावले होते. सुदैवाने सर्व यंत्रणेच्या योग्य समन्वयामुळे अपघातग्रस्त टँकरपासून मोठा धोका टळला. महावितरणच्या या कामगिरीची दखल घेत महानगरपालिकेचे आयुक्त श्री. शेखर सिंह यांच्याहस्ते सहायक अभियंता श्री. संतोष झोडगे यांचा गौरव करण्यात आला.

पुणे परिमंडल कार्यालयातील चार सुरक्षारक्षकांचा गौरव



सुरक्षा रक्षकांचा गौरव करताना मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार, सोबत इतर मान्यवर

समयसूचकता व चोख कर्तव्य बजावणाऱ्या पुणे परिमंडलाच्या रास्तापेठ येथील प्रशासकीय इमारतीमधील चार सुरक्षारक्षकांचा मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. काही दिवसांपूर्वी पहाटे चारच्या सुमारास प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील एका कार्यालयात शॉर्टसर्किट होऊन धूर निघत होता. दरम्यान इमारत व परिसरात गस्त घालत असताना या धुराच्या गंधावरून रात्रपाळीचे सुरक्षा रक्षक सर्वश्री विजय खांडेकर, संजीव मोपरे, अयुब ठाकुरे व अनिल सुळगेकर यांनी समयसूचकता दाखवत तातडीने संबंधित कार्यालयात गेले व वीजपुरवठा खंडित केला. तसेच आग लागण्याच्या बेतात असताना ती विझवली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

या कामगिरीची दखल घेऊन या चारही सुरक्षा रक्षकांचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी कौतुक केले. तसेच शाल, श्रीफळ व प्रशस्तिपत्र प्रदान करून गौरव केला. यावेळी स्थापत्य विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. संजीव नेहेते, कार्यकारी अभियंता श्री. विजेंद्र मुळे, 'मेस्को'चे पर्यवेक्षक श्री. संजीव मोपरे आदींची उपस्थिती होते.

कामाची सचोटी सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यास पूरक ठरेल : श्री. रमेश गांधी



बैठकीत उपस्थित मुख्य विधी सल्लागार श्री. रमेश गांधी, सहव्यवस्थापकीय संचालक श्री. प्रकाश खपले, औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे व इतर

कर्मचाऱ्यांचे प्रश्न, न्यायप्रविष्ठ प्रश्न, समन्स, न्यायालयीन नोटिसा यांचा निपटारा करण्यासाठी समय सूचकता ठेवावी. तात्काळ वरिष्ठ अधिकारी व विधी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून संदर्भीय कागदपत्रांसह पाठपुरावा करून पुढील कार्यवाहीसाठी विनाविलंब सचोटी पणाला लावून प्रकरण सादर करावे. त्यामुळे संभाव्य दंडात्मक कारवाई टळेल व कंपनीची प्रतिमा सुधारण्यास मदत होइल, असे प्रतिपादन महावितरणचे मुख्य विधी सल्लागार श्री.रमेश गांधी यांनी केले. महावितरण औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयात मानव संसाधन विभाग व विधी विभागाअंतर्गत विशेष आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. प्रकाश खपले, औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे, उप महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. प्रवीण बागूल, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. मोहन काळोगे, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सर्वश्री चेतन वाघ, चंद्रकांत खाडे, सुदर्शन कालेवाड, श्रीमती स्वाती चव्हाणगाडेकर, विधी अधिकारी श्रीमती किशोरी तळेले व प्रादेशिक कार्यालय अंतर्गत मानव संसाधन विभागाचे अधिकारी यांची उपस्थिती होती.

मुख्य विधी सल्लागार श्री. गांधी पुढे म्हणाले की, कर्मचारी हा कंपनीचा आत्मा आहेत. त्यांना काम करतांना प्रोत्साहन मिळावे. त्यासाठी त्यांची प्रलंबित प्रकरणे विनाविलंब तत्काळ निकाली काढून त्याच वेळी सेवापुस्तकामध्ये नोंदी संबंधितानी घ्यावी. यामध्ये जन्म तारीख, शैक्षणिक पात्रता, सामान्य आदेश, सेवानिवृत्ती लाभ, पदोन्नती, रजा नोंद, शिस्तभंग कारवाई आदी प्रकरणांची सविस्तर नोंद सेवापुस्तकामध्ये वेळोवेळी कराव्यात. त्यांच्या सत्य प्रतीही माहितीसाठी जोडाव्यात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे कार्यालयीन प्रश्न विनाविलंब सोडविण्यासाठी मौलिक मदत होते व कंपनीची प्रतिमा जनमानसात आणि कर्मचाऱ्यांमध्ये चांगली राहते.

या प्रसंगी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. प्रकाश खपले मार्गदर्शन करतांना म्हणाले की, कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती प्रकरणे, अनुकंपधारकांचे प्रश्न अशा संवेदनशील प्रकरणांचा वेळेत निपटारा करावा. मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांनी कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक नोंदी त्यात्यावेळी मानव संसाधन विभागाने घेवून संघटनांच्या तक्रारींचा वेळेवर निपटारा करण्याचे सांगीतले.

मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनानिमित्त ध्वजारोहण



मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची सामुहिक प्रतिज्ञा घेताना अधिकारी व कर्मचारी

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधुन प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद व परिमंडळ कार्यालय औरंगाबाद येथे सहव्यवस्थापकीय संचालक श्री प्रकाश खपले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त सामुहिक प्रतिज्ञा घेण्यात आली तसेच प्रबोधनकार स्व. केशव ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

या प्रसंगी श्री. खपले मार्गदर्शन करताना म्हणाले की, मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांनी प्राणाचे बलिदान देऊन स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांचे बलिदान अविस्मरणीय असून मराठवाड्यातील सर्व नागरिकांनी तन मन धन पणाला लावून विकासात योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे म्हणाले की, मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा लढताना स्वातंत्र्य संग्रामातील सैनिकांनी अहोरात्र लढा देवून स्वातंत्र्य मिळविले आहे. त्याचे महत्व लक्षात घेवून प्रत्येकांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रम प्रसंगी प्रभारी उप महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. लक्ष्मिकांत राजेझी, अधीक्षक अभियंते सर्वश्री शांतीलाल चौधरी, मोहन काळोगे, कार्यकारी अभियंते सर्वश्री प्रेमसिंग राजपूत, सतीश खाकसे, रमेश वाघचौरे, श्रीमती निधी गौतम,सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

विश्वविक्रम



कु. तन्वी व कु. सान्वी

शिवगंगा रोलर स्केटींग क्लब, बेळगांव, कर्नाटक तर्फे मे २०२३ मध्ये जागतिक स्तरावरील स्पर्धा – जिनयस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डकरिता आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कु. तन्वी चेतन भागवत आणि कु. सान्वी चेतन भागवत यांच्या चमुने सहभाग नोंदवुन १०० मीटरचे अंतर ११.२१ सेकंदात यशस्वीरित्या पुर्ण करून विश्व विक्रमाची नोंद केली आहे. कु. तन्वी आणि कु. सान्वी या मुख्य कार्यालय, प्रकाशगड येथील वितरण विभागात कार्यरत उपकार्यकारी अभियंता सौ. स्मिता चेतन भागवत यांच्या कन्या आहेत.

Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at Jyotiring Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32,
N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : श्री. भारत पवार | उपसंपादक : श्री. विश्वजीत भोसले
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)